||संस्कृती रक्षति: स्त्री शक्ति:||

भगिनी मंडळ चोपडा संचलित

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा

## ता.चोपडा, जि.जळगांव

स्थापना वर्ष-१९९४



# वार्षिक अहवाल

## वर्ष २०२२-२३


सुंदरगढी, चुंचाळे रोड,ता.चोपडा,

जि.जळगांव

फोन नं.०२५८६-२२३०९६

Web site - www.bmcswchopda.org e-mail- bmcsw.chopda@gmail.com

# भगिनी मंडळ चोपडा संचलित,
# समाजकार्य महाविद्यालय चोपडा, जि.जळगांव
## - <u>महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल- 2022-23</u>

**दिनांक- 01/08/2022- वृक्षारोपण कार्यक्रम-**

समाजकार्य मविद्यालयात वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. संस्थेच्या अध्यक्षा मा.पुनमताई गुजराथी यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आली. विविध वृक्षांची लागवड आवारात करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमास मविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सौंदाणकर,विभाग प्रमुख डॉ.अनंत देशमुख, विद्यार्थी विकास विभाग प्रमुख प्रा. नारसिंग वळवी, रासेयो विभाग प्रमुख डॉ.राहूल निकम व हजर होते.



**दिनांक- 01/08/2022- लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी कार्यक्रम तसेच स्वा.अण्णाभाऊ साठे पुण्यतिथी कार्यक्रम** -समाजकार्य मविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी




**दिनांक-09/08/2022- जागतीक आदिवासी दिन कार्यक्रम**

कार्यक्रम प्रसंगी समाजकार्य मविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी



**दिनांक-12 ऑगस्ट 2022- 'राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस'** ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या 130 व्या जयंती निमित्त 'राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस' साजरा करण्यात आला. त्यानिमित्त महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. याप्रसंगी ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात** आले होते. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



**दिनांक-09/08/2022- स्वराज्य महोत्सवानिमित्ताने सामुहीक राष्ट्गीत गायनाचा कार्यक्रम-** प्रसंगी समाजकार्य मविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी





**दिनांक-13 ते 15 ऑगस्ट 2022 - 75 वा स्वातंत्र्य दिन महोत्सवा निमित्ताने कार्यक्रम**





चोपडा येथील समाजकार्य महाविद्यालयामार्फत वैजापूर येथे राष्ट्रध्वजाचे वाटप करण्यात आले. शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या आश्रम शाळा, वैजापूर येथे या "हर घर तिरंगा" उप्रक्रमांतर्गत रॅली काढण्यात आली व घरोघरी राष्ट्रध्वजाचे वाटप करण्यात आले.






**दिनांक-19/09/2022- महाविद्यालय,चोपडा येथे पेटंटधारक प्राध्यापकांचागुणगौरव सोहळा** -

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथे पेटंटधारक गुणवंत प्राध्यापकांचा गुणगौरव सोहळा नुकताच संपन्न झाला. "आंतरवैयक्तिक हिंसाचाराचा सार्वजनिक आरोग्यावर होणारा परिणाम तपासण्याचा एक अभिनव मार्ग " या शोधनिबंधावर प्राचार्य डॉ.पी.एस. पाटील,प्रा.डॉ.जगदीश सोनवणे, प्रा.डॉ. घनश्याम जगताप आणि प्रा.डॉ.राहुल निकम यांना भारत सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. हे क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव., सावित्रीबाई फुले विद्यापीठ,पुणे या विद्यापीठातील पहिलेच पेटंट आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.सौ.अश्विनीताई गुजराथी (सहसचिव, भगिनी मंडळ शैक्षणिक संकुल, चोपडा.)होत्या.कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी मा.सौ.पुनमताई गुजराथी (अध्यक्षा, भगिनी मंडळ शैक्षणिक संकुल,चोपडा.), मा.सौ.छायाताई गुजराथी (उपाध्यक्षा, भगिनी मंडळ शैक्षणिक संकुल,चोपडा) प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर, उपप्राचार्य प्रा.डॉ. आशिष गुजराथी, मुख्याध्यापक अरुण संदानशिव ,प्राचार्य उदय ब्रम्हे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.अनंत देशमुख यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला.




या वेळी बोलतांना सत्कारार्थी डॉ.जगदीश सोनवणे यांनी शोधनिबंधाची संकल्पना व पेटंट बाबतची सखोल माहिती यांनी विद्यार्थ्यांना दिली. शोधनिबंधासाठी घेतलेले सातत्यपूर्ण प्रयत्न विशद केले. प्राचार्य डॉ. पी.एस. पाटील यांनी सत्कारार्थी या नात्याने पेटंटचे आजच्या काळातील महत्वपूर्णता विद्यार्थ्यांना समजवून सांगितली. सौ.अश्विनीताई गुजराथी यांनी संशोधन हे समृद्धीकडे जाण्याचा राजमार्ग असल्याचे नमूद करीत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी संशोधन करावे असे आवाहन केले. पेटंटधारक प्राध्यापकांचे अभिनंदन केले. सौ. पुनमताई गुजराथी यांनी समाजकार्यातील प्राध्यापकांना मिळालेले पेटंट हे आभिमानस्पद बाब असल्याचे स्पष्ट करत अधिक जोमाने कार्य करण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदांणकर, उपप्राचार्य डॉ. आशिष गुजराथी, सौ.छायाताई गुजराथी यांनी पेटंटधारक प्राध्यापकांचे अभिनंदन करीत विद्यार्थ्यांना संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.मारोती गायकवाड यांनी केले.आभारप्रदर्शन प्रा.डॉ.विनोद रायपुरे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी यांनी केले. सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

**दिनांक-02/10/2022- महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती कार्यकम-**

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर होते. कार्यक्रमाच्या सुरवातीस महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.राहुल निकम यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर प्रकाशझोत टाकत गांधीजी व लालबहादूर शास्त्री यांचे जीवनविषयक तत्वज्ञान मानवाच्या विकासास उपकारक असल्याचे सांगितले. महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात स्वछता मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. पुढे एक आठवडाभर ही माहीम राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांकडून महाविद्यालयात राबविण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. संबोधी देशपांडे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा.डॉ.विष्णू गुंजाळ,प्रा.डॉ. अनंत देशमुख,प्रा.डॉ. उत्तम सोनकांबळे, प्रा.डॉ.मोहिनी उपासनी,प्रा.कल्पना सोनवणे यांच्यासह बहुसंख्य प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारिवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.






**दिनांक-07/10/2022- संशोधन पद्धती विषयावर कार्यशाळा संपन्न-**

समाजकार्य महाविद्यालयात संशोधन सल्लागार समिती द्वारा आयोजित या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदाणकर यांचे हस्ते करण्यात आले. टी.वाय.बी.एस.डब्ल्यू.आणि एम.

एस.डब्ल्यू.द्वितीय वर्ष या वर्गाच्या विद्यार्थ्यांना या वर्षाच्या अभ्यासक्रमात लघुशोध प्रबंध करावा लागतो. या अनुषंगाने या विद्यार्थ्यांना संशोधन पद्धतीचे ज्ञान व्हावे , माहिती व्हावी या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेत संशोधन विषयाची निवड या विषयावर प्रा. डॉ. विनोद रायपुरे , साहित्याचे परीक्षण प्रा. डॉ. विष्णू गुंजाळ, संशोधनाचे उद्देश प्रा. डॉ. मोहिनी उपासनी, संशोधनाची गृहीत कृत्ये प्रा.डॉ.राहुल निकम, तथ्य संकलन प्रा.डॉ.मारोती गायकवाड, तथ्य विश्लेषण प्रा.डॉ.उत्तम सोनकांबळे, संदर्भ ग्रंथ सूची प्रा.डॉ.संबोधी देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
या कार्यशाळेचे आयोजन संशोधन सल्लागार समितीचे सदस्य प्रा.डॉ.विष्णू गुंजाळ व प्रा. डॉ.विनोद रायपुरे यांनी केले होते. या कार्यशाळेचा विद्यार्थ्यांना संशोधनासाठी उपयोग होणार आहे असे मत प्राचार्य डॉ.सौंदाणकर यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेचे सुत्र संचलन आणि साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन करणा-या सर्व प्राध्यापकांचे प्रा.डॉ.विष्णू गुंजाळ यांनी आभार व्यक्त केले





तरुण भारत
Main Edition | 2022-10-09 | Page- 6
epaper.tarunbharatjalgaon.com

चोपडा समाजकार्य महाविद्यालयात 'संशोधन पद्धती'वर कार्यशाळा

Powered by iDocuments

**दिनांक 15/10/2022- "वाचन प्रेरणा दिवस व 90 वा सामाजिक न्याय स्थापना दिवस" साजरा**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर होते. या वेळी विचारपीठावर प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा विविवी सहा. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.आशिष गुजराथी, विविवी कार्यक्रम अधिकारी प्रा.नारसिंग वळवी हजर होते. यासोबत उमवी समाजकार्य विभाग अभ्यास मंडळ अध्यक्ष प्रा.डॉ.विनोद रायपुरे, महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता सुधार समिती समन्वयक प्रा.डॉ.अनंत देशमुख, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.राहुल निकम, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. संबोधी देशपांडे, ग्रंथपाल प्रा.कल्पना सोनावणे इ.हजर होते. कार्यक्रमाच्या सुरवातीस उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रा.डॉ.आशिष गुजराथी यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. आजच्या कार्यक्रमाची आवश्यकता स्पष्ट करीत सामाजिक न्याय विभागाचे कार्य थोडक्यात विद्यार्थ्यांसमोर मांडले. आपल्या व्याख्यानात विद्यार्थ्यांना अधिकाधिक



वाचण्याचे आणि आपल्या वाढदिवसाला महाविद्यालयात पुस्तक भेट देण्याचे आवाहन केले.प्रा.डॉ.विनोद रायपुरे


यांनी वाचन संस्कृतीचे महत्व पटवूनदिले. "वाचाल तर वाचाल " या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या घोषवाक्याचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. सामाजिक न्याय विभागाची उपयोगिता सांगितली. प्रा.डॉ.राहुल निकम यांनी महापुरुषांच्या जीवनावर प्रकाशझोत टाकीत वाचनाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. सामाजिक न्याय विभागाचे कार्य हे समाजातील दुर्बल घटकांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी, अधिकाधिक सक्षम करण्यासाठी असल्याचे सांगितले. प्रा.कल्पना सोनवणे यांनी महाविद्यालयातील विविध पुस्तकांची माहिती विद्यार्थ्यांना दिली व या सुसज्ज ग्रंथालयाचा लाभ घेण्याचा आवाहन केले. या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी अनिल बिविस्कर यांनी नेहरू युवा केंद्र,चोपडा या कल्याणकारी संस्थेच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना महापुरुषांच्या जीवनकार्याची माहिती देणाऱ्या पुस्तिका मोफत वाटल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वाचन प्रेरणा दिनाच्या शुभेच्छादिल्या. अधिकाधिक वाचन करून जीवन समृध्द करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. नारसिंग वळवी यांनी केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक - प्राध्यापकेतर कर्मचारिवृंद व विद्यार्थी हजर होते.

**दिनांक 11/11/2022- "एरंडोलविभागीय आंतर महाविद्यालययीन क्रीडा स्पर्धा "**

कला, वाणिज्य व  विज्ञान महाविद्यालय चोपडा येथे झालेल्या मैदानी स्पर्धेत पाटील हितेश सखाराम ट्रिपल जम्प स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

**दिनांक 12/11/2022- "पथनाट्य प्रशिक्षण कार्यशाळा "** ऑनलाईन पथनाटय **प्रशिक्षण कार्यशाळा**

वेळ- सकाळी ठीक ११ ते १२ वा. साधन व्यक्ती  *श्री दिपक सैंदाणे, पुणे *श्री किरण बागुल, नासिक






**दिनांक 21/11/2022- महाविद्यालयाच्या Internal Exam घेण्यात आल्यात.**

**दिनांक-26 नोव्हेंबर 2022 - "संविधान गौरव दिवस" कार्यक्रम उत्साहात संपन्न -**

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथे 73 व्या संविधान दिनानिमित्ताने " भारतीय संविधान आणि सद्यस्थिती " या विषयावर विषेश व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.आशिष गुजराथी होते. या वेळी विचारपीठावर रासेयो विभागाचे कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी विकास विभागाचे कार्यक्रम अधिकारी, कार्यक्रम व्याख्याते डॉ.उत्तम सोनकांबळे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. राहुल निकम यांनी केले. भारतीय संविधानावर आणि बाबासाहेबांच्या मानवतावादी कार्यावर प्रकाशझोत टाकत त्यांच्या कार्यप्रती कृतज्ञता प्रकट केली. या वेळी सामूहिकरित्या भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. या वेळी 26 /11/2008 च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी व्याख्याता म्हणून बोलतांना प्रा.डॉ. उत्तम सोनकांबळे यांनी आपल्या व्याख्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी

लिहलेल्या संविधानाचे महत्त्व सांगितले. संविधानाच्या माध्यमातून मिळालेल्या हक्क आणि अधिकारांची मानवी जीवनातील उपयोगिता सांगितली. संविधान समजून घेण्यासाठी संविधान वाचण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले. प्रा.नारसिंग वळवी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेले संविधान हे सर्वांकरिता उपयुक्त असल्याचे नमूद केले. उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी यांनी अध्यक्षीय मनोगतातून सर्व विद्यार्थ्यांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या. संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याप्रती कृतज्ञता प्रकट केली. या वेळी विद्यार्थी विकास विभागामार्फत आर्थिक दुर्बल घटक योजनेतील लाभार्थी विद्यार्थ्यांना धनादेशाचे वाटप उपस्थित सर्व प्राध्यापकांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. सर्वांना संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.राहुल निकम यांनी केले. आभारप्रदर्शन रासेयोच्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.संबोधी देशपांडे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक - प्राध्यापकेतर कर्मचारिवृंद व विद्यार्थी हजर होते.




**दिनांक-28 नोव्हेंबर 2022 ते 4 डि सेंबर,2022 - "ग्रामिण शिबीर" कार्यक्रम उत्साहात संपन्न -**

प्रथम वर्ष बी.एस.डब्ल्यू. व एम.एस.डब्ल्यू. या अभ्यासक्रमाचे "ग्रामिण शिबीर" हे निमगव्हाण ता.चोपडा येथे घेण्यात आले.








समाजकार्य विद्यालयाचा MSW-I चा विद्यार्थी आकाश सिरसाळे यास **स्टेट लेवल पावर लिफ्टिंग गोल्ड मेडल** प्राप्त झलेया . यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्, उपप्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदातर्फ मनःपूर्वक अभिनंदन.




**दिनांक- १ डिसेंबर 2022 स्व.डॉ.सुशीलाबेन शाह यांच्या ८२ व्या जयंती निमित्ताने सुशील शिक्षक पुरस्कार वितरण कार्यक्रम** -

सुशील शिक्षक पुरस्कार महाविद्यालयातील प्रा.डॉ.अनंत विनायकराव देशमुख यांना देण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा.डॉ.विजय महेश्वरी, कुलगुरू, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जलगाव यांच्या हस्ते झाले. यावेळी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वर्गखोल्यांचेही उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.




**दिनांक- 06 डिसेंबर 2022 महापरिनिर्वाण दिन-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 66 व्या महानिर्वाण दिना निमित्ताने त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला डॉ.आशिष गुजराथी यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. या कार्यक्रमास समाजकार्य मविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



**शक्ती तोल स्पर्धा- 09/12/2022**

सौ.रजनीताई नानासाहेब देशमुख कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय भडगाव* येथे आयोजित एरंडोल विभाग *आंतर महाविद्यालयीन शक्ती तोल व शरीरसौष्ठव क्रीडा* स्पर्धेमध्ये आपल्या ***समाजकार्य महाविद्यालय चोपडा* येथील *एम. एस.डब्ल्यू. प्रथम वर्षाचा* विद्यार्थी *आकाश आनंदा शिरसाळे शक्ती तोल स्पर्धे अंतर्गत *द्वितीय* आणि शरीरसौष्ठव क्रीडा स्पर्धेमध्ये *तृतीय*** आला आहे. त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदांनकर, उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी, क्रीडा शिक्षक डॉ. मारोती गायकवाड, महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.





**दिनांक-१९/१२/२०२२ ते ३०/११/२०२३ आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रम**

आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन विभाग मंत्रालय, मुंबई राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नवी दिल्ली व राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने पुरस्कृत व जळगाव जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आयोजित आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रमात महाविद्यालयातील खालील विद्यार्थीनी सहभाग घेतला.

१) जगताप यश पंढरीनाथ    २) गोंधळी अजय    ३) माळी राहुल

४) येवले हर्षल    ५) माळी राजेंद्र ६) सोनावणे जितेंद्र

**दिनांक-२२ व २३ डिसेंबर, NAAC Peer Team Visit**





देशोन्नती

चोपडा समाजकार्य महाविद्यालयाला नॅकचे 'ए' मानांकन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**चोपडा** ■ येथील भगिनी मंडळ संचलित समाजकार्य महाविद्यालयाला नॅक (राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद) या राष्ट्रीय संस्थेतर्फे 'ए' मानांकन प्राप्त झाले आहे.

२२ व २३ डिसेंबर रोजी प्रा. केसरी लाल वर्मा (छत्तीसगड), प्रा. अंकुर सक्सेना (गुजराथ), डॉ. विक्टोरिया मेरी (तामिळनाडू) या त्रिसदस्यीय समितीने महाविद्यालयाची, येथील शैक्षणिक व भौतिक सुविधांची तसेच महाविद्यालयाच्या उपक्रमांची पाहणी करत येथील प्राध्यापक, माजी विद्यार्थी, पालक, महाविद्यालयाशी संबंधित विविध घटकांशी चर्चा केली होती. या समितीने पाठवलेल्या निरीक्षणाच्या आधारे महाविद्यालयाला ए मानांकन दिले असल्याचे नॅकचे डॉ. एस. सी. शर्मा यांनी कळवले आहे. सदर मानांकन हे पुढील पाच वर्षासाठी वैध असणार आहे. गेल्या अनेक वर्षापासून ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांच्या विकासास हातभार लावणाऱ्या संस्थेच्या या प्रयत्नांना समितीने गौरवले आहे. समाजकार्य महाविद्यालयाने दुसऱ्या चरणामध्ये हे मूल्यांकन प्राप्त केले आहे.

याबद्दल माजी विधानसभा अध्यक्ष अरुणभाई गुजराथी, संस्थेच्या अध्यक्ष पूनम गुजराथी, उपाध्यक्ष छाया गुजराथी, सचिव अश्विनी गुजराथी, प्राचार्य डॉ. ईश्वर संवर्धनकर उपप्राचार्य डॉ. आशिष गुजराथी, समन्वयक डॉ. अनंत देशमुख यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त केला.

Deshonnati Edition
Dec 29, 2022 Page No. 4
Powered by : eMalaGo.com

**दिनांक- १२/०१/२०२३**

***'राष्ट्रीय युवा सप्ताह अंतर्गत सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा संपन्न***

समाजकार्य महाविद्यालय व नेहरू युवा केंद्र, चोपडा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या

प्रतिमांचे पूजन व माल्यार्पण करून स्पर्धेस सुरूवात करण्यात आली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेविषयी गोडी निर्माण होवून स्पर्धा परीक्षेचे स्वरूप त्यांना ज्ञात व्हावे या उद्देशाने या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.





सदर परीक्षा बहू पर्यायी स्वरूपाची होती यात ६५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला तर अमोल पाटील याने प्रथम, लोकेश गवळी याने द्वितीय तर रेवती सपकाळे हिने तृतीय क्रमांक पटकाविला या विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

**दिनांक- १८/०१/२०२३ ते २४/०१/२०२३ *'राष्ट्रीय सेवा योजना शिबीर संपन्न***

समाजकार्य महाविद्यालय,चोपडा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या ग्रामीण श्रमसंस्कार शिबिराचे उदघाटन दि.18/01/2023 रोजी अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, बोरअजंटी, ता.चोपडा येथे झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आश्रमशाळेच्या माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक किरण पाटील होते. कार्यक्रमाचे उदघाटन माजी सैनिक सुभाष श्रीराम शिरसाठ यांनी कुंडीतील झाडाला पाणी टाकून केले.

या वेळी विचारपीठावर माजी सैनिक गोपाल सोनवणे, मुख्याध्यापक दौलत पावरा, पवार सर, पावरा सर, रासेयो चे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.राहुल निकम, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.संबोधी देशपांडे हे होते. कार्यक्रमाच्या सुरवातीस संस्थेच्या आद्य संचालिका कै.डॉ.सुशीलाबेन गुजराथी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. प्रा.डॉ.राहुल निकम यांनी प्रास्ताविक केले. विशेष ग्रामीण श्रमसंस्कार शिबिराचा उद्देश स्पष्ट केला. या शिबिरांतर्गत क.ब.चौ.उ.म.वि.यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार विविध उपक्रम राबविले जाणार असल्याचे स्पष्ट केले.




उदघाटक सुभाष शिरसाठ यांनी रासेयो स्वयंसेवकांनी शिबिराच्या माध्यमातून समाजविकास व स्वविकास साधावा असे आवाहन केले. किरण पाटील यांनी ग्रामीण शिबीर हे रासेयो स्वयंसेवकांकरिता सुवर्णसंधी असल्याचे मत व्यक्त करीत या माध्यमातून स्वयंसेवकांना श्रमसंस्काराचे महत्व पटेल असे मत व्यक्त केले.







शिबिराच्या यशस्वीतेसाठी अनुदानित आश्रमशाळेचे संचालक जितेंद्र भादले, धनंजय भादले व कर्मचारिवृंद यांचे सहकार्य लाभले.

**दिनांक-२६/०१/२३** गुरुवार- प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात झेंडा वंदन करण्यात आले.



प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने नेहरू युवा केंद्र, जळगाव आयोजित तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेतील गोळा फेक या स्पर्धेत **श्री अमोल सुनील पाटील.**याने तृतीय क्रमांक मिळवला.





**तसेच** क्रीडा स्पर्धेतील स्पर्धेतील १०० मीटर धावणे धावणे या स्पर्धेत **कु मुन्नी.गेजा पावरा** तृतीय क्रमांक मिळवला त्याबद्दल १०० मीटर धावणे या स्पर्धेत तृतीय क्रमांक

मिळवला त्याबद्दल तीचे संस्थेच्या अध्यक्षा मा.पूनम गुजराथी, महाविद्यालयाचे डॉईश्वर सौंदाणकर. व सर्व कर्मचारी वृंद समाजकार्य महाविद्यालय, चोपडा यांनी अभिनंदन केले.

**दिनांक- २८फेब्रुवारी,२०२३ परम् श्रध्देय गोवर्धनदास भिकारीदास उर्फ बाबाजी स्मृती प्रित्यर्थ आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजन-** या स्पर्धेत *श्री अनिल बाविस्कर.याने प्रथम क्रमांक मिळवला त्याबद्दल संस्थेच्या अध्यक्षा आणि महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी अभिनंदन केले.





**दिनांक-०६/०२/२०२३ समाजकार्य महाविद्यालयाने राबवली तापी नदी स्वच्छता व पर्यावरण संवर्धन-**

समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथील विद्यार्थी विकास विभागामार्फत चोपडा तालुक्यातील तापी नदी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यामध्ये विद्यार्थी विकास विभागाचे समन्वयक प्रा.नारसिंग वळ्वी, सहसमन्वयक डॉ. आशिष गुजराथी यांनी निमगव्हाण गावातील गावकर्यांच्या मदतीने तापी नदीपात्राचे निरीक्षण करून सर्वेक्षण केले. तापी नदीच्या पात्रात केरकचरा, प्लास्टिक, इतर घाण मिसळली जात आहे. या गोष्टीना आळा घालण्यासाठी प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी गावकर्यांचे प्रबोधन केले. सर्व विद्यार्थ्यांनी नदीचे पात्र स्वच्छ करण्यासाठी प्रत्यक्ष कारवाही सुरू केली. या कामी गावकर्यांनी देखील सहकार्य केले, तसेच यापुढे नदी स्वच्छ ठेवण्यासाठी आम्ही देखील कटाक्षाने काळजी घेऊ असे आश्वासन दिले.



**दि.15/02/2023 एम.एस.डब्लू.भाग-२ शैक्षणिक सहलीचे आयोजन**

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथिल समाजकार्य पारंगत भाग-2 (M.S.W.IIND) या वर्गाची शैक्षणिक सहल (संस्था भेट उपक्रम) धुळे येथे दि.15/02/2023 रोजी संपन्न झाली.या दरम्यान खान्देश कॅन्सर रिसर्च सेंटर, धुळे, सिव्हिल हॉस्पीटल धुळे,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण धुळे,जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग धुळे,दामिनी कौटुंबिक सल्ला केंद्र धुळे ,स्वामी नारायण ट्रस्ट धुळे,या संस्थांना

भेट देऊन संबंधित संस्थाचे उपक्रम ,व्यवस्थापन व प्रशासन इ.विषयी माहिती जाणून घेतली,या शैक्षणिक सहलीचे आयोजन प्रा. डॉ.विष्णू गुंजाळ व प्रा.डॉ.संबोधी देशपांडे मॅडम यांनी केले होते.







**दिनांक १९, फेब्रुवारी २०२३- शिवजयंतीनिमित्त <u>जागर शिव विचारांचा कार्यक्रम-</u>**

शिवजयंती निमित्त समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथील विद्यार्थी विकास विभागा मार्फत जागर शिव विचारांचा हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा सौ.पूनमताई गुजराथी, सहसचिव सौ.अश्विनीताई गुजराथी, प्राचार्य, ईश्वर सौंदाणकर, संस्थेच्या सर्व विभागाचे मुख्याध्यापक, विभाग प्रमुख, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

वक्त्यांमध्ये कु.जागृती बारी हिने उत्तम पोवाडा सादर केला. तसेच चौधरी कार्तिक, हर्षदा सुशीर, ठाकूर सुयश, यांनी आपल्या वक्तृत्वातून शिवरायांविषयी विविध विषयांवर विचार प्रगट केले व गुण गायले. कार्यक्रमाचे नियोजन प्रा.डॉ.आशिष गुजराथी यांनी केले. तर सूत्रसंचालन डॉ. विनोद रायपुरे यांनी व आभार प्रा.नारसिंग वळवी यांनी मानले केले. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी सहकार्य केले.





**<u>दिनांक- १९/०२/२०२३ 'युवा संसद'</u>* कार्यशाळेत सहभाग-**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यार्थी विकास विभाग, जळगाव आणि लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय, विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय एकदिवशीय *'युवा संसद'* कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना भारतीय लोकशाहीचा कणा असलेली संसदीय कार्य प्रणाली प्रत्यक्ष अनुभवता यावी त्यातून सुजाण आणि प्रगल्भ तरुण पिढी निर्माण व्हावी, त्यांनी देशाच्या लोकशाही आणि संसदीय

प्रणाली मध्ये सुयोग्य राजकीय नेतृत्व करून देशाच्या लोकशाहीला अधिक मजबूत करावे. या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथील MSW द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी कु.हर्षदा सुशीर व MSW प्रथम वर्षाचे विद्यार्थी श्री.अनिल बाविस्कर व चि.अरूण भोई यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.





**<u>दिनांक- २८/०२/२०२३ साद-प्रतिसाद</u>"* सांस्कृतिक कार्यक्रम-**

विद्यार्थ्याच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयातर्फे 'साद-प्रतिसाद' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. ज्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे त्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विवीध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केल.









क्रिकेट स्पर्धांचे उद्घाटन करताना डॉ.आशिष गुजराथी **व** सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना विद्यार्थी

**<u>दिनांक- 11 मार्च 2023 एक दिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद :-</u>**

समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथे 'महात्मा जोतीराव फुले आणि सामाजिक सुधारणा " या विषयावरील एकदिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद संपन्न झाली. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी श्री. आशिषभाई गुजराथी हे होते. परिषदेचे उदघाटन प्रा.डॉ.आंबादास मोहिते (अध्यक्ष, मास्वे संघटना ) यांनी केले. बीजभाषक प्रा.डॉ.विलास चव्हाण हे होते. प्रमुख अतिथी चंद्रहास गुजराथी (अध्यक्ष, ओम शांती नागरी सह. पत. मर्या. चोपडा.), सौ.पुनमताई गुजराथी (अध्यक्षा, भगिनी मंडळ शैक्षणिक संकुल, चोपडा), सौ.अश्विनीताई गुजराथी (सहसचिव, भगिनी मंडळ शैक्षणिक संकुल, चोपडा.) प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर, उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी, प्राचार्य डॉ.रघुनाथ महाजन, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिह दीक्षित, प्रा.डॉ.सोनवणे, प्राचार्य उदय ब्रहमे, प्राचार्य डॉ.संजय चौधरी, प्राचार्य सुनील बारी आदी मान्यवर होते. परिषदेचे समन्वयक प्रोफेसर डॉ.विष्णू गुंजाळ, प्रा.डॉ.राहुल निकम, प्रा.डॉ.संबोधी देशपांडे हे होते. परिषदेच्या आयोजनाबद्दल आशीषभाई अरुणलाल गुजराथी, सौ.पुनमताई गुजराथी, सौ.अश्विनीताई गुजराथी यांनी समाधान व्यक्त केले. परिषदेत 62 शोधनिबंधाच्या जर्नलचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी सौ.पुनमताई गुजराथी यांना जाहीर झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला पुरस्काराबद्दल विचारपीठावरील मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या परिषदेसाठी देशभरातून अनेक अभ्यासक, संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी व शिव, शाहू, फुले आंबेडकर विचारधारेचे पाईक उपस्थित होते. उपस्थित संशोधकांनी आपल्या संशोधन निबंधाचे वाचन केले. परिषदेच्या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. सोनवणे ( नेत्रांग समाजकार्य महाविद्यालय, नेत्रांग, गुजरात) हे होते. परिषदेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ईश्वर सौंदाणकर, उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी समन्वयक प्रोफेसर डॉ.विष्णू गुंजाळ, प्रा.डॉ.राहुल निकम, प्रा.डॉ. संबोधी देशपांडे यांनी परिश्रम घेतले. प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारिवृंद यांचे मोलाचे सहकार्य लाभले. परिषदेचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.राहुल निकम यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा.डॉ.संबोधी देशपांडे यांनी केले.







***प्रा.डॉ.विष्णू गुंजाळ यांच्या "अव्यक्त "व प्रा.डॉ.राहुल निकम यांच्या "समुदाय संघटन" पुस्तकाचे प्रकाशन -**

भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय,चोपडा या आमच्या महाविद्यालयात "महात्मा जोतीराव फुले आणि सामाजिक सुधारणा" या विषयावरील एकदिवसीय आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सन्माननीय संस्थाप्रमुख, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर, संशोधक, प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, अभ्यासक व विद्यार्थी उपस्थित होते. या मान्यवरांच्या उपस्थितीत *प्रा.डॉ.राहुल निकम लिखित* *"समुदाय संगठन (Community Organization)" व प्रा.डॉ. विष्णू गुंजाळ लिखित "अव्यक्त " या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.



**दिनांक-१४ एप्रिल, २०२३ डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती-**



कार्यक्रम प्रसंगी समाजकार्य मविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी

**दिनांक-२८ एप्रिल, २०२३** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांची स्थानिक व्यवस्थापन समिती भेट देण्यात आली. या समितीत अध्यक्ष -डॉ.उषा भीमसिंग वसावे, तर सदस्य- डॉ.निलेश गायकवाड, डॉ.नितीन तायडे, डॉ.रामचंद्र परदेशी होते.

**दिनांक-०६ मे, २०२३** विद्यापीठाची बी.एस.डब्ल्यू. परीक्षा सुरु झाली.
**दिनांक-१६ मे, २०२३** विद्यापीठाची एम.एस.डब्ल्यू. परीक्षा सुरु झाली.





कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सहाय्यता निधीचे वाटप करताना प्राचार्य डॉ.ईश्वर सौदाणकर, उपप्राचार्य डॉ.आशिष गुजराथी], शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी






एम.एस.डब्लू. व बी.एस.डब्लू. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना शोधप्रबंधसाठी मार्गदर्शन करताना व विद्यार्थ्यांची RAC मीटिंग घेताना प्राध्यापक.






महाविद्यालयाच्या संशोधन विभागात Ph.D. विद्यार्थ्यांना शोधप्रबंधसाठी मार्गदर्शन करताना व विद्यार्थ्यांची RAC मीटिंग घेताना संशोधन विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक.


लोकमत

समाजकार्य महाविद्यालयात सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा


तरुण भारत

Main Edition | 2023-01-22 | Page 2

epaper.tarunbharatjalgaon.com

रासेयो स्वयंसेवकांच्या श्रमदानातून बोरअजंटी येथे बंधारा

Powered by iDocuments

## STUDENT'S ENROLMENT

NAME OF COLLEGE- **BMC'S,COLLEGE OF SOCIAL WORK, CHOPDA, DIST-JALGAON** COLLEGE CODE-140052

FACULTY AND COURSE - **MM&SS- B.S.W. & M.S.W.** **YEAR-2022-23**

| YEAR | INTAKE | SC | | ST | | VJ/DT | | NT-B | | NT-C | | NT-D | | SBC | | OBC | | OPEN | | TOTAL | | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| U.G. | CAPACITY | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | |
| FIRST YEAR | 40+6 | 3 | 1 | 14 | 12 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 10 | 1 | 0 | 0 | 31 | 15 | 46 |
| SECOND YEAR | 40 | 4 | 3 | 3 | 7 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 5 | 4 | 2 | 1 | 16 | 18 | 34 |
| THIRD YEAR | 40 | 2 | 2 | 5 | 12 | 1 | 0 | 1 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 11 | 2 | 0 | 1 | 20 | 19 | 39 |
| **TOTAL** | **126** | **9** | **6** | **22** | **31** | **1** | **0** | **4** | **2** | **2** | **1** | **0** | **0** | **1** | **3** | **26** | **7** | **2** | **2** | **67** | **52** | **119** |
| P.G. | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| FIRST YEAR | 60+20 | 9 | 4 | 11 | 2 | 0 | 0 | 4 | 2 | 2 | 2 | 0 | 0 | 6 | 2 | 14 | 15 | 5 | 2 | 51 | 29 | 80 |
| SECOND YEAR | 60 | 4 | 4 | 6 | 13 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 2 | 0 | 0 | 2 | 1 | 7 | 15 | 0 | 2 | 22 | 37 | 59 |
| **TOTAL** | **140** | **13** | **8** | **17** | **15** | **0** | **0** | **4** | **2** | **5** | **4** | **0** | **0** | **8** | **3** | **21** | **30** | **5** | **4** | **73** | **66** | **139** |
| **GRANT TOTAL** | **266** | **22** | **14** | **39** | **46** | **1** | **0** | **8** | **4** | **7** | **5** | **0** | **0** | **9** | **6** | **47** | **37** | **7** | **6** | **140** | **118** | **258** |

**CERTIFICATE COURSE**

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Counselling | 60 | 5 | 5 | 8 | 12 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 2 | 0 | 0 | 2 | 2 | 9 | 8 | 1 | 1 | 27 | 30 | 57 |
| NGO's Manegment | 60 | 0 | 4 | 1 | 16 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 5 | 6 | 0 | 3 | 9 | 30 | 39 |
| PG Diploma in Management | 60 | 4 | 4 | 5 | 2 | 0 | 0 | 3 | 2 | 2 | 2 | 0 | 0 | 4 | 2 | 12 | 11 | 5 | 2 | 35 | 25 | 60 |
| Communication Skill in English | 40 | 0 | 0 | 2 | 4 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 4 | 6 |
| **TOTAL** | **220** | **9** | **13** | **16** | **34** | **1** | **0** | **4** | **2** | **5** | **5** | **0** | **0** | **6** | **4** | **26** | **25** | **6** | **6** | **73** | **89** | **162** |

महाविद्यालयात प्रवेशीत विद्यार्थी व उत्तीर्ण झालेले विद्यार्थी संख्या आणि टक्केवारी दर्शविणारा तक्ता

| वर्ष | प्रवेशीत वर्ग | प्रवेशीत विद्यार्थी | | | परीक्षेस बसलेले विद्यार्थी | | | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | M | F | Total | M | F | Total | M | F | Total | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 2022-23 | F.Y.B.S.W. | 31 | 15 | 46 | 24 | 15 | 39 | | | 0 | 0.00 |
| | S.Y.B.S.W. | 16 | 18 | 34 | 11 | 15 | 26 | | | 0 | 0.00 |
| | T.Y.B.S.W. | 20 | 19 | 39 | 19 | 19 | 38 | | | 0 | 0.00 |
| | Total | 67 | 52 | 119 | 54 | 49 | 103 | 0 | 0 | 0 | 0.00 |
| | M.S.W.-I | 51 | 29 | 80 | 47 | 27 | 74 | | | 0 | 0.00 |
| | M.S.W.-II | 22 | 37 | 59 | 22 | 34 | 56 | | | 0 | 0.00 |
| | Total | 73 | 66 | 139 | 69 | 61 | 130 | 0 | 0 | 0 | 0.00 |
| | Grand Total | 140 | 118 | 258 | 123 | 110 | 233 | 0 | 0 | 0 | 0.00 |

**Students coming from families with income below the poverty line -2022-23**

| Class | S.C.( G.O.I.) | | SC Freeship | | SBC GOI | | SBC Freeship | | OBC GOI | | OBC Freeship | | NT GOI | | NT Freeship | | ST GOI | | ST Freeship | | Total | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F |
| FYBSW | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 4 | 8 | 0 | 0 | 6 | 11 |
| SYBSW | 0 | 3 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 3 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 4 | 0 | 0 | 2 | 13 |
| TYBSW | 2 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 2 | 0 | 0 | 2 | 2 | 0 | 0 | 2 | 9 | 0 | 0 | 10 | 15 |
| MSW -I | 5 | 1 | 0 | 1 | 4 | 2 | 0 | 0 | 9 | 10 | 0 | 1 | 3 | 3 | 0 | 0 | 8 | 2 | 0 | 0 | 29 | 20 |
| MSW -II | 4 | 2 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 7 | 4 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 11 | 0 | 0 | 16 | 20 |
| **Total** | **11** | **9** | **0** | **2** | **4** | **6** | **0** | **0** | **21** | **20** | **2** | **2** | **6** | **6** | **0** | **0** | **19** | **34** | **0** | **0** | **63** | **79** |
| | 20 | | 2 | | 10 | | 0 | | 41 | | 4 | | 12 | | 0 | | 53 | | GOI | | 61 | 78 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | Freeship | | 2 | 4 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | Open | | 0 | 0 |

Principal
Bhagini Mandal Chopda Sanchalit
College of Social Work,Chopda